**CNR No :- MHST070014212026**

**–: दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २४/२०२६ :–**
**–: निशाणी क्र. ०१ वरील आदेश :–**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारसा कायदा ३७२ प्रमाणे मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील यांचे अर्जदार हे उत्तराधीकारी असल्याबाबतचा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील हे अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल असुन त्यांचा मृत्यु दि.१४/०८/२०२० रोजी झाला. त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. कै.बाळासाहेब रामचंद्र पाटील यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या नावे असलेला लिकर परवाना त्यांचे नावे करणेसाठी संबंधीत कार्यालयास भेट दिली असता त्यांना सक्सेशन सर्टीफिकेटची मागणी करण्यात आली. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०३. अर्ज व अभिलेखावर सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री.आर.पी.गांधी यांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी अर्जाच्या पृष्ट्यर्थ नि.क्र.३/१ वर लिकर परवान्याची झेरॉक्स प्रत, नि.क्र.३/२ वर बाळासाहेब रामचंद्र पाटील यांच्या मृत्यूच्या दाखल्याची व्हेरीफाईड प्रत, नि.क्र.३/३ वर अन्न, नागरी पुरवठा संरक्षण विभाग यांचेकडील ऑनलाईन प्रत, नि.क्र.३/४ वर ग्रामपंचायत चिखली यांचेकडील वारस दाखला इ. कागदपत्रे सादर केली आहेत. अर्जदार यांचा पुरावा संपल्याबाबतची पुरशीस नि.क्र.१७ वर दाखल केली आहे.

०५. अर्जदार यांच्यातर्फे कै.बाळासाहेब रामचंद्र पाटील यांच्या वारसांबाबत हरकती मागविण्याकरीता दैनिक 'तरुण भारत' या वृत्तपत्रात दि.१६/०४/२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. सदर वृत्तपत्राची प्रत नि.क्र.०९ कडे दाखल केली आहे. परंतु, याकामी अर्जदार यांच्या अर्जास कोणीही हजर होऊन हरकत घेतलेली नाही.

०६. अर्जदार क्र.३ यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१३ वर दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता, त्यांनी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तसेच श्री.वच्छपाल बाबुराव यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१४ वर दाखल केले आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन करता अर्जदार हेच मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील यांचे वारस असल्याचे कथन केले आहे. अर्जदार यांनी नि.क्र.३/२ कडे दाखल केलेल्या कै.बाळासाहेब रामचंद्र पाटील यांच्या मृत्यूच्या दाखल्याच्या व्हेरीफाईड प्रतीचे अवलोकन केले असता ते दि.१४/०८/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदर दाखल्याचे तसेच गाव मौजे चिखली, ता.कराड यांचे वारस दाखल्याचे अवलोकन करता अर्जदारच्या कथनांस पुष्टी मिळते. अर्जदार यांनी सादर केलेला मौखिक पुरावा तसेच कागदोपत्री पुरावा विना आव्हानीत राहिला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेल्या मागणीबाबत दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन देखील याकामी कोणीही हजर होऊन अर्जदार यांच्या मागणीस हरकत नोंदविलेली नाही. अर्जदार यांच्या अर्जातील कथने व सादर केलेला पुरावा हा विनाआव्हानीत राहिला आहे. अशा परिस्थितीत अर्जदार क्र. १ ते ३ हेच मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील यांचे उत्तराधीकारी आहेत; हे मान्य करणे क्रमःप्राप्त आहे. सबब, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या नावे भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ नुसार उत्तराधीकार प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरतात. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :-

## :: आदेश ::

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील याचे सरळ व कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करण्यात येते.

०३. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील याचे कायदेशीर वारस या नात्याने त्यांच्या नावे असलेला लिकर परवाना अर्जदार क्र.१ ते ३ यांचे नावे करणेसाठी, कायद्याप्रमाणे आवश्यक असलेले न्यायालयीन मुद्रांक न्यायालयात जमा केल्यानंतर त्यांचे नावे भारतीय वारसा

कायदा कलम ३७२ च्या तरतुदीनुसार उत्तराधिकार प्रमाणपत्र प्रतिलिखीत करुन देण्यात यावा.

०४. सदरचे उत्तराधिकार प्रमाणपत्र हे मयत बाळासाहेब रामचंद्र पाटील याचे नावे असलेला लिकर परवाना अर्जदार क्र.१ ते ३ यांचे नावे करणेपुरताच मर्यादीत आहे.

०५. खर्चाबाबत आदेश नाही.

YASHODHAN PRADEEP BAVKAR
Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.08.10 17:28:21 +0530

दिनांक :–१०/०८/२०२६
कराड

(श्री. वाय.पी. बावकर)
५ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी 'क' स्तर,
कराड, जि.सातारा.